# Institutional Distinctiveness

## Promotion of Girl's Education

Our college Late Dattatraya Pusadkar Arts College, Nandgaon Peth is a leading college in the rural village Nandgaon Peth providing higher education in the field of Social Science and Humanities. The college runs only UG programme in Humanities having four Ph.D. research center in the subject of History, Marathi, Sociology and Home Economics. There is an efficient staff having 88.88% Ph.D. holders teachers. The college is proposed for PG programmes in Histoy and Marathi and PG Diploma Course in Fashion Designing. The college is located in rural area fulfilling the view of its founder president Late Someshwarji Pusadkar in the welfare of girl students in the area.

The girl's enrollment excels to boys. Most of the students are coming from nearby villages to complete their UG education. Taking into consideration the large enrollment of the girls students, the college governs its distinctiveness as gender equality. The girls are fully secured in the college premises. The college celebrates various programmes in the honour of girls.

The college organizes a weekly programme 'Stree Janmache Swagat' (Welcome the Birth of Woman') every year in the month of October on the occassion of 'Navratri Mahotsav'. In this weely programme there is continuous celebration of Rangoli Competition, Essay competition, Elocution Competition, Fashion show of Traditional Wearings, Seminar etc. on the theme of 'Save Girl Child'.

Every year on the 3$^{rd}$ January on the occassion of birth anniversary of 'Savitribai Phule' the college gives 'Savitribai Phule Aadarsha Palak Puraskar' to those parents who give importance to girls education without having any discrimination among their sons and daughters. A certificate of honour, 3001/- Rs. Cash, Shawl, Shriphal and Bouquet is a form of award.

The college frequently organizes special programmes for Women Empowerment such as Workshop on 'Women Self-Employment', 'Save Girl Child Campaign' (Lek Wachwa Abhiyaan), ' Chala Udyojak Hou Ya' ( Webinar on Entrepreneurship of Women),'Cycle Training Programme' for girls students as a conveyance facility. The college runs one UG programme only for girl

students in the subject of Home Economics. By the department many training programmes, workshops, projects are organized for them.

There is an active part of girls students in the cultural and youth festival and game and sports also. They have a good performance in the game of Kabaddi, Kho Kho and Athletics. The Kho Kho team of the girls of the college won University Winner Award twicely in the year 2015 and 2016.

It is our great pride that the college has meritorious tradition since 2002 that begins from girls. Having one exception all girl students secured merit places in the university merit list consistently from 2002. Some of them secured Gold Medals in various subjects. Our ex girl students secured merit places in the PG programmes in other institution. Among these students some are professors, teachers, police constables, lawyer, recruited in Reserve Police Force and Military Force of India and some of them settled their own business. We feel proud in maintaining such distinctiveness for the welfare of the girls belonging to poor families in the rural villages. It is our best achievement that our college was awarded by the Government of Maharashtra in 2014 for the programme 'Jagar Janivacha' for promoting gender equality.

(Dr. Vijay Darne)
Principal
Late Dattatraya Pusadkar Arts College
Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

# Programme organized to promote girl's education

### Distribution of "Adarsha Palak Puraskar" on the occasion of Birth Anniversary of Krantijyoti Savitribai Fule organized every year

**2014-15**









TheHitavada

NAGPUR ■ Wednesday ■ January 7 ■ 2015

...competition. (Right) Dr Vijay Darne and others felicitating Pratibha Wadurkar.

...ceedings. Amarjeet Prasad proposed a vote of thanks.

**Late Dattatrya Pusadkar Arts College**, Nandgaon Peth organised Savitribai Phule Ideal Guardian Award distribution programme under Jagar Janivancha drive. The college has started the Savitribai Phule Ideal Guardian Award from this year.

The award will be presented to those who are promoting women education and striving for the girl education against all the odd condition.

Dr Vijay Darne, Principal, presided over. Roshani Shendarkar, former meritorious student, was the chief guest. The award comprising Rs. 2001 and certificate was presented to Pratibha Vishwas Wadurkar.

The award was presented to Pratibha Wadurkar for fighting against all the financial crisis and getting three daughters educated after her husband's death. Vinod Shendarkar was also felicitated at the hands of the guests with shawl, shrifal and bouquets.

Dr Govind Tirmanwar delivered the introductory remarks, Mahendra Wankhade conducted the proceedings while Priyanka Dongre proposed a vote of thanks.

Dr P R Jadhav, R T Brahmane, Dr Shrikant Mahulkar, Dr Sunita Balapure, Dr S K Pawar, V T Adlok, Dr P D More, Pranali Gaudik, Dhnyaneshwar Baraskar, Vinayak Pawade, Dilip Parwe, Rahul Pande and all the employees and students were present in large numbers for the programme.

**Nationalist Student Congress** Party also celebrated the day here recently.

Sushil Gawande, District President of Nationalist Student Congress Party, inaugurated the programme by performing the portrait of Savitri Phule and also by garlanding to it.

Guests threw light on the works done by Savitri Phule for the welfare and progress of the women in their respective speeches on the occasion.

Amol Patil, District Vice-President of Nationalist Student Congress Party, Shubham Hole, Shubham Borekar, Gaurav Ingle, Govind Hundekar, District Publicity Chief, Suraj Kaware, Saurabha Dahake, Nikesh Wadalkar, Chetan Thakare, Nikesh Bonde, Utkal Kokate, Atul Kharode, Suraj Dahat, Vicky Kharode, Gopinath Bhatta, Prafulla Thakare and many others were prominantly present on the occasion. Shivani Burange conducted the proceedings while Shubham Hole proposed a vote of thanks.



वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

देशोन्नती

बुधवार, दि. ७ जानेवारी २०१५

## सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार प्रतिभा वडूरकर यांना

# 2015-16



स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय

नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

**सावित्रीबाई फुले**
**आदर्श पालक पुरस्कार - २०१६**

**श्री. श्रीरामजी लक्ष्मणराव शेंदरकर**

रा. नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती.

मुलगा-मुलगी असा कोणताही भेदभाव न करता आपण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या सर्वच मुलींना उच्चशिक्षण देण्याचे पवित्र कार्य करीत आहात. आपले कार्य समजासाठी एक आदर्श व स्त्री शिक्षणाला चालना देणारे आहे. आपण करीत असलेल्या कार्याचा गौरव करण्याच्या हेतूने महाविद्यालयातील **'जागर जाणीवांचा अभियान'** अंतर्गत स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा **आदर्श पालक पुरस्कार - २०१६** (रुपये २००१/- चा धनादेश व मानपत्र) आपणास प्रदान करण्यात येत आहे.

(डॉ. व्ही. डी. दरणे)
प्राचार्य

दि. ५ जानेवारी २०१६

## श्रीरामजी शेंदरकर यांना सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार



**अमरावती (प्रतिनिधी) :** नांदगाव पेठ येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात जागर जाणिवांचा अभियानांतर्गत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या कार्यक्रम व सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे तर प्रमुख पाहुणे म्हणुन महाविद्यालयाच्या माजी गुणवंत विद्यार्थ्यांनी शीतल तायवाडे, रोशनी शेंदरकर या उपस्थित होत्या.

मुलगा मुलगी असा कोणताही भेदभाव न करता अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत मुलींच्या शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या व त्यांना प्रोत्साहन देणाऱ्या पालकांना सावित्रीबाई फुले यांचा मानाचा हा आदर्श पालक पुरस्कार महाविद्यालयातर्फे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी दरवर्षी देण्यात येतो. २००१ रू. चा धनादेश, मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. २०१६ चा सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार नांदगाव पेठ येथील शेंदरकर यांना देण्यात आला. श्रीरामजी शेंदरकर यांनी अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आपल्या पाचही मुलींना उच्च शिक्षन दिले. त्यांचे हे कार्य समाजासाठी आदर्श आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन आणि इतर पालकांनी मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने महाविद्यालयाने त्यांना पुरस्कार प्रदान केला.

सदर कार्यक्रमाच्या सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पाहुण्यांच्या हस्ते पुजन करून हारार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जागर जाणिवांचा अभियानाचे समन्वयक डॉ. गोविंद तिरमनवार यांनी, संचालन डॉ. सुभाष पवार तर आभारप्रदर्शन डॉ. श्रीकांत माहुलकर यांनी केले. कार्यक्रमाला डॉ. पी. आर. जाधव, प्रा. राजेश ब्राम्हणे, डॉ. सुनीता बाळापुरे, प्रा. विकास अडलोक, डॉ. पंकज मोरे, ज्ञानेश्वर बारस्कर, विनायक पावडे, दिलीप पारवे, राहुल पांडे तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**2016-17**




epaper.lokshahivarta.in
अमरावती वार्ता

२२ जानेवारी २०१८

## दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचा जागर जाणीवांचा उपक्रम

# सावित्रीबाई आदर्श पालक पुरस्काराचे वितरण



अमरावती/प्रतिनिधी

नांदगाव पेठ येथील दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयीन जागर जाणीवांचा अभियानांतर्गत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंती कार्यक्रम व सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे हे होते प्रमुख पाहुणे म्हणून ग्रंथपाल प्रा. विकास अडलोक तसेच महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी भाग्यश्री तांबे उपस्थित होत्या.

कार्यक्रमाप्रसंगी सुरुवातीला क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयीन जागर जाणीवांचा अभियानांतर्गत महाविद्यालयातर्फे दरवर्षी स्त्री शिक्षणाला चालना देणाऱ्यांना व मुलगा-मुलगी असा कोणताही भेदभाव न करता प्रतिकुल परिस्थितीत मुलींच्या शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या पालकांना सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी देण्यात येतो. त्यानुसार यावर्षीचा आदर्श पालक पुरस्कार नांदगाव पेठ येथील अशोक कापडे यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या हस्ते देण्यात आला. रुपये २००१चा धनादेश व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप होते. अशोक कापडे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या चारही मुलींना उच्च शिक्षण देत आहेत. त्यांचे कार्य समाजासाठी आदर्श असेच आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन आणि इतर पालकांना मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने महाविद्यालयाने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली.

याप्रसंगी अशोक कापडे, भाग्यश्री तांबे, जयश्री कापडे, कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे, प्रा. विकास अडलोक यांनी मनोगत व्यक्त केले. प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी पुरस्कार देण्यामागची भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.गोविंद तिरमनवार, सूत्रसंचालन डॉ.सुभाष पवार आणि आभार चंद्रशेखर ठवरे यांनी मानले.

कार्यक्रमाला डॉ.पी.आर.जाधव, प्रा. आर. टी. ब्राम्हणे, डॉ. श्रीकांत माहुलकर, डॉ. सुनीता बाळपुरे, डॉ.पी.डी.मोरे, प्रा. शीतल तायवाडे, प्रा. रसीका ठाकरे, ज्ञानेश्वर बारस्कर, विनायक पावडे, दिली पारवे, राहुल पांडे यांच्यासह सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 2017-18




१६
भारतीय सौर १९ पौष १९३९
अमरावती, मंगळवार ९ जानेवारी २०१८
हिंदुस्थान
www.dainikhindusthan.com

## पुसदकर महाविद्यालयातर्फे सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्काराचे वितरण



**नांदगाव पेठ (वार्ताहर):** येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम व सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. महाविद्यालयातर्फे देण्यात येणारा सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा यावर्षीचा आदर्श पालक पुरस्कार श्रीमती कोकीळाबाई रमेशराव साकोरे यांना देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सौ. सुनिता बाळापुरे उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमाप्रसंगी सुरूवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले याच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. महाविद्यालयातर्फे दरवर्षी स्त्री शिक्षणाला चालना देणाऱ्यांना व मुलगामुलगी असा कोणताही भेदभाव न करता प्रतिकुल परिस्थितीत मुलींच्या शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या पालकांना सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या दिनी देण्यात येतो. त्यानुसार यावर्षीचा आदर्श पालक पुरस्कार श्रीमती कोकीळाताई रमेशराव साकोरे यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांच्या हस्ते देण्यात आला. रू. २००१/- चा धनादेश व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप होते. श्रीमती कोकीळाताई या पती निधनानंतर अत्यंत प्रतिकुल परिस्थितीत आपल्या चार मुलींना उच्च शिक्षण देत आहेत. त्यांचे कार्य समाजासाठी आदर्श असेच आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेवून आणि इतर पालकांना मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने महाविद्यालयाने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. कायक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गोविंद तिरमनवार यांनी सुत्र संचालन रोशनी पोकळे तर आभार प्रदर्शन प्रा. विकास अडलोक यांनी केले.

सदर कार्यक्रमाला डॉ. पी. आर. जाधव, प्रा. आर. टी. ब्राह्मणे, डॉ. श्रीकांत माहुलकरे, डॉ. एस. के. पवार, डॉ. पी. डी. मोरे, प्रा. शीतल तायवाडे, प्रा. रसिका ठाकरे, ज्ञानेश्वर बारस्कर, विनायक पावडे, दिलीप पारवे, राहुल पांडे यांचेसह सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## 2018-19




शुक्रवार,
१८ जानेवारी २०१९

**विदर्भ मतदार**

# स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयातर्फे सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्काराचे वितरण

**नांदगाव पेठ ( प्रतिनिधी) :** येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम व सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. महाविद्यालयातर्फे देण्यात येणारा सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा यावर्षीचा आदर्श पालक पुरस्कार मनोहरराव किसनराव कळंबे यांना देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून विद्याभारती महाविद्यालय, अमरावती येथील प्राणीशास्त्र विभागाच्या विभागप्रमुख प्रा. डॉ. वसुधा वानखडे या उपस्थित होत्या. या प्रसंगी व्यासपीठावर डॉ. सौ. सुनीता बाळापुरे आणि पुरस्काराचे मानकरी मनोहरराव कळंबे व सौ. सुनीता कळंबे हे मान्यवर उपस्थित होते.



सदर कार्यक्रमाप्रसंगी सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रास्ताविकातून डॉ. गोविंद तिरमनवार यांनी आदर्श पालक पुरस्कार वितरणामागची भूमिका विशद केली. प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. विकास अडलोक यांनी करून दिला. स्त्री शिक्षणाला चालना देणाऱ्या व मुलगा मुलगी असा कोणताही भेदभाव न करता प्रतिकूल परिस्थितीत मुलींच्या शिक्षणासाठी धडपड करणाऱ्या पालकांना सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार दरवर्षी महाविद्यालयातर्फे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी देण्यात येतो. त्यानुसार यावर्षीचा आदर्श पालक पुरस्कार मनोहरराव कळंबे यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रू. २००१ चा धनादेश व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप होते. मनोहरराव कळंबे हे अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या सर्व मुलींना उच्च शिक्षण देत आहेत. मुली नकोच ही विकृत भावना समाजात आजही कायम असताना आणि त्यातून स्त्री-भ्रूणहत्येसारखे पाप समाजात घडत असताना मनोहरराव कळंबे यांचे कार्य समाजासाठी आदर्श असेच आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन आणि इतर पालकांना मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने महाविद्यालयाने पुरस्कारासाठी त्यांची निवड केली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्नेहल मुळे यांनी तर आभार प्रदर्शन पुजा चिरडे यांनी केले.

# 2019-20






**मातृभूमि**

शनिवार, दि. १८ जानेवारी २०२०

## स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयातर्फे सावित्रीबाई फुले

# आदर्श पालक पुरस्काराचे वितरण

प्रतिनिधी/ १७ जानेवारी

**नांदगाव पेठ :** येथील स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचा कार्यक्रम व सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला. महाविद्यालयातर्फे देण्यात येणारा सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा यावर्षीचा आदर्श पालक पुरस्कार श्रीमती अनिता संतोषराव डोईफोडे यांना देण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून नांदगाव पेठ येथील सामाजिक कार्यकर्ते व रक्तदान चळवळीत अग्रेसर असलेले गजानन इंगळे हे उपस्थित होते.


या प्रसंगी व्यासपीठावर पुरस्काराचे मानकरी श्रीमती अनिता संतोषराव डोईफोडे उपस्थित होत्या. सदर कार्यक्रमाप्रसंगी सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पुजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. त्यानंतर प्रास्ताविकातून डॉ. गोविंद तिरमनवार यांनी आदर्श पालक पुरस्कार वितरणामागची

शिक्षणाला चालना देणा-या व मुलगा मुलगी असा कोणताही भेदभाव न करता प्रतिकूल परिस्थितीत मुलींच्या शिक्षणासाठी धडपड करणा-या पालकांना सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार दरवर्षी महाविद्यालयातर्फे सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीदिनी देण्यात येतो. त्यानुसार यावर्षीचा आदर्श पालक पुरस्कार श्रीमती अनिता संतोषराव डोईफोडे यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. रू. २००१ चा धनादेश व मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरुप होते. श्रीमती अनिता संतोषराव डोईफोडे या अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या मुलींना उच्च शिक्षण देत आहेत. मुली नकोच हि विकृत भावना समाजात आजही कायम असताना आणि त्यातून स्त्री-भ्रूणहत्येसारखे पाप समाजात घडत

डोईफोडे यांचे कार्य समाजासाठी आदर्श असेच आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याची दखल घेऊन आणि इतर पालकांना मुलींच्या शिक्षणासाठी प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने महाविद्यालयाने पुरस्कारासाठी त्यांची निवड केली. या प्रसंगी नांदगाव पेठ येथील रक्तदान चळवळीचे प्रणेते गजानन इंगळे यांचा प्राचार्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहूणे गजानन इंगळे यांनी महाविद्यालयाच्या या

उपक्रमाची प्रसंशा केली आणि उपस्थितांना उपयुक्त असे मार्गदर्शन केले. कु. दुर्गा डोईफोडे हिने आपल्या आईच्या वतीने मनोगत व्यक्त करताना आईप्रती व महाविद्यालयाप्रती कृतज्ञता व्यक्त केली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे यांनी अध्यक्षीय विवेचन केले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन डॉ. सुनीता बाळापुरे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. विकास अडलोक यांनी केले. सदर कार्यक्रमाला डॉ. पी. आर. जाधव, प्रा. राजेश ब्राम्हणे, डॉ. श्रीकांत माहुलकर, डॉ. सुभाष पवार, डॉ. पंकज मोरे, ज्ञानेश्वर बारस्कर, विनायक पावडे, दिलीप पारवे, राहूल पांडे, अनिल शेंवतकर आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# 2021-22



स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय

नांदगाव पेठ, ता. जि. अमरावती

NAAC Accredited 'B' Grade

सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार - २०२२

श्री अनिलराव अमृतराव तायडे

रा. नांदुरा लष्करपूर, ता. जि. अमरावती

मुलगा-मुलगी असा कोणताही भेदभाव न करता आपण अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आपल्या सर्वच मुलींना शिक्षण देण्याचे पवित्र कार्य करीत आहात. आपले कार्य समाजासाठी एक आदर्श व स्त्री शिक्षणाला चालना देणारे आहे. आपण करीत असलेल्या कार्याचा गौरव करण्याच्या हेतूने महाविद्यालयाच्यावतीने स्त्री शिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या नावाचा आदर्श पालक पुरस्कार - २०२२ (रूपये ३१००/- चा धनादेश व मानपत्र) आपणास प्रदान करण्यात येत आहे.

दि. ३ जानेवारी २०२२

(डॉ. विजय दरणे)
प्राचार्य









# News Paper Cuttings

## स्त्री शिक्षणाप्रती पालकांनी मानसिकता बदलायला पाहिजे : प्राचार्य डॉ.विजय दरणे

### सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्काराने अनिल तायडे सन्मानित




### अनिल तायडे सावित्रीबाई फुले आदर्श पालक पुरस्कार से सम्मानित

## स्त्री शिक्षा के प्रति पालकों को अपने विचार बदलने चाहिए







### प्राचार्य डॉ. विजय दरणे का प्रतिपादन

(Dr. Vijay Darne)
Principal
Late Dattatraya Pusadkar Arts College
Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

# Organized One Week Programme to Welcome the Birth of Girl Child



# Photographs


















## News Paper Cuttings

# स्त्री जन्माचे स्वागत सप्ताह उत्साहात संपन्न

## स्व.दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचे आयोजन



अमरावती दि. २० : नांदगाव पेठ येथील स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने नवरात्रीउत्सवाच्या पार्श्वभूमीवर स्त्री शक्तीचा जागर करण्याच्या हेतूने आणि स्त्री जन्माचे उत्साहात सर्वांनी स्वागत करावे ही भावना सर्वांमध्ये निर्माण झाली पाहिजे याही उद्देशाने स्त्री जन्माच्या स्वागत सप्ताहाचे आयोजन आभासी पध्दतीने करण्यात आले. या सप्ताहाचे उद्घाटन सौ.सुरेखाताई लुंगारे, नगरसेविका मनपा अमरावती यांनी केले. उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विजय दरणे हे होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.गोविंद तिरमनवार यांनी सदर सप्ताहाच्या आयोजनामागची भूमिका प्रास्ताविकातून स्पष्ट केली. सुरेखाताई लुंगारे यांनी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे कौतुक करीत समाजाने मुलगा व मुलगी असा भेद न करता मुलीच्या जन्माचे उत्साहाने स्वागत करावे असे विचार याप्रसंगी व्यक्त केले.

सात दिवसीय सप्ताहांतर्गत डॉ.सारिका बोंदरे यांचे स्त्रियांचे मानसिक स्वास्थ्य, सौ.केतकी पाकोडकर यांचे आम्ही सावित्रीच्या लेकी, डॉ.तृप्ती गावंडे यांचे स्त्री भ्रूणहत्या आधुनिक समाजाला महारोग, डॉ.स्वप्ना देशमुख यांचे करुया स्त्री जन्माचे स्वागत, कु.पल्लवी राजगुरे यांचे मुलापेक्षा मुली की प्रकाश दे दोन्ही घरी, सौ.सोनाली खडिकर -कालोने यांचे इतिहास घडविणाऱ्या स्त्रियांचा असा विविध महत्वाच्या विषयावर व्याख्याने झाली. सर्वच वक्त्यांनी अभ्यासपूर्ण असे मार्गदर्शन केले. आपल्या व्याख्यानातून मुलीच्या जन्माचे स्वागत करण्याचा महत्वपूर्ण संदेश दिला. समारोपीय कार्यक्रमाला ग्रामपंचायत नांदगाव पेठ च्या सदस्य सौ.कृपाली इंगळे या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या. अध्यक्षस्थानी डॉ.विकास अडलोक हे होते.

सदर सप्ताहातील आयोजित सातदिवशीय व्याख्यानाचे सूत्रसंचालन रासेयो महिला कार्यक्रम अधिकारी तथा स्वागत सप्ताहाचे संयोजिका डॉ.सौ.सुनिता काळपांडे यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ.गोविंद तिरमनवार यांनी केले. शुभ ऑनलाइन घेण्यात आलेल्या या सप्ताहाला तांत्रिक सहाय्य प्रा.विकास अडलोक व प्रा.सुभाष पवार यांनी केले. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य डॉ.विजय दरणे यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो सहकार्यक्रम अधिकारी डॉ.सुभाष पवार, डॉ.पी.आर.जाधव, प्रा.राजेश ब्राम्हणे, प्रा.श्रीकांत मालुसकर, प्रा.पंकज मोरे, डी.एम.वारस्कर, विनायक घरडे, दिलीप पाले, राहुल घोडे, अनिल शेलकर यांनी परिश्रम घेतले. सप्ताहातील व्याख्यानांचा लाभ महाविद्यालयातील मुला-मुलींना झाला.

---

# स्त्री जन्माचे स्वागत सप्ताह उत्साहात

## स्व.दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयाचे आयोजन



[illegible]

(Dr. Vijay Darne)
Principal
Late Dattatraya Pusadkar Arts College
Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

**Photographs of One Day Entrepreneurship Workshop on "Candle Making"**

**Date : 12/09/2020**






College Code 104

(Dr. Vijay Darne)
Principal
Late Dattatraya Pusadkar Arts College
Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.

# “Be  a Entrepreneur” Workshop



**Photographs of One Day State Level Workshop on "Be a Entrepreneur"**









**Cycle Training Programme for Girls Students**
**"Jagar Strishakticha"**









Bhushan Kewatkar
Photography
8390672924

# Workshop on "Self Employment of Women"










Late Dattatraya Pusadkar Arts College
Nandgaon Peth, Tq. & Dist. Amravati.
(Accredited 'B' Grade by NAAC)
U.G.C. Sponsored
under Extension
Workshop on
'Women Self Reliance And Empowerment'
Dr. Abhiram Dabir
Dr. Vijay D. Darne
Dr. Sunita Balapure

पुरोगामी राष्ट्रीय विचाराचे दैनिक

# हिंदुस्थान

www.dainikhindusthan.com
marathe_vinod1@rediffmail.com

दिनांक ६ मार्च २०१८ ■ ■ संस्थापक : कै. श्री. बाळकृष्ण विष्णू मराठे ■ ■ भारतीय सौर

## पुसदकर कला महाविद्यालयात महिला स्वयंरोजगार कार्यशाळा




अमरावती (प्रतिनिधी) : स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय नांदगांव पेठ येथे विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत महिला स्वयंरोजगार व सशक्तीकरण या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेचे उद्घाटन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी डॉ. अभिराम डबीर यांचे हस्ते झाले. अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे आणि प्रमुख वक्त्या डॉ. सुनिता बाळापुरे होत्या.

जीवन जगत असतांना मानवाला त्यांच्या मानसिक उदासीनतेमुळे त्याला मरगळ आलेली असते. त्याला विविध क्षेत्रात स्वयंरोजगार असुनही माणूस निष्क्रीयतेमुळे हातपाय गाळुन बसतो. त्यामुळे त्यांच्यात नैराश्य व दुःख त्याला येते हे येऊ नये म्हणून महिलांमध्ये व मुलींमध्ये स्वयंरोजगाराची प्रेरणा व त्यांच्यात सशक्तीकरण निर्माण करण्याकरिता महाविद्यालयातील विद्यार्थीनीसाठी व नांदगांव पेठ पंचक्रोशीतील महिलांसाठी एक दिवसीय महिला स्वयंरोजगार व सशक्तीकरण या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

प्रस्तुत महिला स्वयंरोजगार व सशक्तीकरण या कार्यशाळेला महाविद्यालयातील विद्यार्थी व नांदगांव पेठ परिसरातील महिला बहुसंख्येनें उपस्थित होत्या. कार्यशाळा यशस्वी करण्याकरिता महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी स्वप्नील देशमुख, लुकेश यावले, राजेश इंगोले, भूषण केवतकर, महाविद्यालयातील जेष्ठ प्राध्यापक प्रा. राजेश ब्राम्हणे, डॉ. श्रीकांत माहुलकर, डॉ. गोविंद तिरमनवार, डॉ. सुभाष पवार, डॉ. पंकज मोरे, प्रा. विकास अडलोक, प्रा. शीतल तायवाडे, प्रा. रसिका ठाकरे, ज्ञानेश्वर बारस्कर, राहुल पांडे, दिलीप पारवे, विनायक पावडे, अनिल शेवतकर यांनी सहकार्य केले.

---

■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे १२ ■ बुधवार ७ फेब्रुवारी, २०१८ • अमरावती • अकोला • वाशि

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

paperboy @janmadhyamonline

● अमरावती ● अकोला ● वाशीम ● वर्धा

## कामाच्या नियोजनाने महिला यशस्वी- डॉ.डबीर

**अमरावती/का.प्र.**

ग्रामीण भागातील महिला व विद्यार्थीनीनी स्वयंरोजगाराकडे वळण्यासाठी कौशल्यपूर्ण व गुणवत्तापूर्ण शिक्षण घेणे आवश्यक आहे. संबंधित शिक्षण संस्थांची व शिक्षकांची ही सर्वात मोठी जवाबदारी आहे. महिलांनी कामाचे नियोजन करुन त्याला अथक परिश्रमाची जोड दिल्यास यश निश्चित मिळु शकते. असे मार्गदर्शन डॉ. अभिराम डबीर यांनी केले. ते महिला स्वयंरोजगार कार्यशाळेत बोलत होते.

स्व.दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय नांदगावपेठ येथे 'महिला स्वयंरोजगार व सशक्तीकरण'या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेचे उदघाटन महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी डॉ.अभिराम डबीर यांनी केले. अध्यक्षस्थान प्राचार्य डॉ.विजय दरणे यांनी भुषविले. तर प्रमुख वक्त्या म्हणून डॉ.सुनिता बाळापुरे उपस्थित होते. कार्यशाळेत डॉ. दरणे यांनी महिलांना उद्योग क्षेत्रात कार्य करण्यासाठी आत्मविश्वासाने अडचणींवर मात करावी असे आवाहन केले तर डॉ.सुनीता बाळापुरे यांनी देशाच्या उभारणीत महिला




योगदान देऊ शकतात. त्यांना प्रोत्साहन मिळणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त करुन महिलांना स्वावलंबी होण्याचे आवाहन केले.

तर डॉ. जाधव यांनी कार्यशाळेची भूमिका मांडली. कार्यशाळेचे संचालन राधिका थोटे यांनी तर आभार प्रदर्शन रोशनी पोकळे यांनी केले.कार्यशाळेच्या यशस्वीतेकरिता माजी विद्यार्थी स्वप्रील देशमुख, मुकेश यावले, राजेश इंगोले, भुषण केवतकर, प्रा.राजेश ब्राम्हणे, डॉ. श्रीकांत माहुलकर, तिरमनवार, डॉ.पवार, डॉ.मोरे, प्रा.अडलोक, प्रा.तायवाडे, प्रा.रसिका ठाकरे, ज्ञानेश्वर बारस्कर, राहुल पांडे, दिलीप पारवे, विनायक पावडे, शेवतकर आदिंनी परिश्रम घेतले.

## लोहाणा मंडळातर्फे रक्तदान शिबीर



---

# पुण्य नगरी


पुण्य नगरी


■ रविवार, १८ मार्च २०१८ ■ अमरावती

**HighLights**

## स्व. दत्तात्रय पुसदकर महाविद्यालयात 'महिला स्वयंरोजगार' विषयावर कार्यशाळा


अमरावती : स्व. दत्तात्रय पुसदकर कला महाविद्यालय, नांदगाव पेठ येथे विद्यापीठ अनुदान आयोग पुरस्कृत 'महिला स्वयंरोजगार व सशक्तीकरण' विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात





आले होते. सदर कार्यशाळेचे उद्घाटन अमरावती येथील महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्राचे विभागीय अधिकारी डॉ. अभिराम डबीर यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय दरणे तर प्रमुख वक्त्या म्हणून डॉ. सुनिता बाळापुरे उपस्थित होत्या. जीवन जगत असताना मानवाला त्याच्या मानसिक उदासीनतेमुळे मरगळ आलेली असते. विविध क्षेत्रात स्वयंरोजगार असूनही माणूस निष्क्रीयतेमुळे हातपाय गाळून बसतो. त्यामुळे त्याच्यात नैराश्य व दुःख येते. हे येऊ नये म्हणून महिलांमध्ये व मुलींमध्ये स्वयंरोजगाराची प्रेरणा व त्यांच्यात सशक्तीकरण निर्माण करण्याकरिता महाविद्यालयातील विद्यार्थीनींसाठी व नांदगाव पेठ पंचक्रोशीतील महिलांकरिता एकदिवसीय 'महिला स्वयंरोजगार व सशक्तीकरण' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला महाविद्यालयातील विद्यार्थिनी व नांदगाव पेठ परिसरातील महिला बहुसंख्येने उपस्थित होत्या.


# Evidence of Success

## Merit Girl Students



# Sports Achievements of Girls








सं.गा.बा. अमरावती विद्यापीठातंर्गत आयोजित आंतर-महाविद्यालयीन
खो-खो (मुली) विजेता संघ - २०१५-१६




सं.गा.बा. अमरावती विद्यापीठातंर्गत आयोजित आंतर-महाविद्यालयीन
मैदानी स्पर्धेमध्ये (मुली) द्वितीय पारितोषीक विजेता संघ - २०१५-१६




सं.गा.बा. अमरावती विद्यापीठातंर्गत आयोजित आंतर-महाविद्यालयीन
क्रॉस कंट्री (मुली) तृतीय पारितोषीक विजेता संघ - २०१७-१८



सं.गा.बा. अमरावती विद्यापीठातंर्गत आयोजित आंतर-महाविद्यालयीन
खो-खो (मुली) उपविजेता संघ - २०१७-१८

LATE DATTATRAYA PUSADKAR ARTS COLLEGE
College Code
164
NANDGAON PETH, TQ. DIST. AMRAVATI

(Dr. Vijay Darne)
**Principal**
Late Dattatraya Pusadkar Arts College
Nandgaon Peth, Tq. Dist. Amravati.